संगणक संकेतांक २०१२२०१११४३६२१६७२५

RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक १५(४)] शनिवार, ऑगस्ट ४, २०१२/श्रावण १३, शके १९३४ [ पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.**—मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर, शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . . . . . . . | १-५ |

दिनांक ३ ऑगस्ट २०१२ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ह. बा. पटेल,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ४ ऑगस्ट २०१२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व व-हाड २. १९६५ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २०१२, असे म्हणावे.

प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियम याची सुधारणा.**

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५०स ची सुधारणा.

२. मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५०स च्या पोट-कलम (२) मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :— १८८८चा मुंबई ३.

" परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमत: पालिका सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशाप्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठ्या अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करून, तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील.".

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १२९अ ची सुधारणा.

३. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२९अ मध्ये, " कलम १२५ अन्वये आयुक्ताने तयार केलेले खर्च व प्राप्तीचे अंदाज " या मजकुरानंतर, " आणि कलम १२६अ अन्वये महाव्यवस्थापकाने तयार केलेले अंदाज " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४६०अ ची सुधारणा.

४. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४६०अ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (३) महाव्यवस्थापकाच्या कोणत्याही प्रस्तावास बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या किंवा महानगरपालिकेच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती किंवा, यथास्थिती, महानगरपालिका, समितीच्या

सचिवाला किंवा, यथास्थिति, महानगरपालिका सचिवाला तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या किंवा, यथास्थिति, महानगरपालिकेच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून उक्त समितीच्या बाबतीत पंचेचाळीस दिवसांच्या आत आणि महानगरपालिकेच्या बाबतीत नव्वद दिवसांच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल किंवा तो निकालात काढील मग अशा प्रस्तावाशी संबंधित बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो, तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीने किंवा, यथास्थिति, महानगरपालिकेने मंजुरी किंवा मान्यता दिलेली आहे असे मानण्यात येईल, आणि महाव्यवस्थापकाकडून तशा आशयाचा अहवाल शासनाला पाठविण्यात येईल आणि त्यानंतर शासनाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करणे हे महाव्यवस्थापकासाठी विधिसंमत असेल :

परंतु, अशी कोणतीही मानीव मंजुरी किंवा मान्यता, ही या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींशी सुसंगत असलेल्या प्रस्तावाच्या व्याप्तीपुरतीच मर्यादित असेल.".

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४६०के ची सुधारणा.

५. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४६०के मध्ये,—

(१) खंड (क) मध्ये, "दहा लाख रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी "पन्नास लाख रुपयांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (ड) मध्ये, "एक लाख रुपयांहून" या मजकुराऐवजी "पाच लाख रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४६०ल ची सुधारणा.

६. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४६०ल मधील परंतुकामध्ये, "परिवहन समितीच्या दोन सदस्यांनी" या मजकुरानंतर "किंवा महाव्यवस्थापकाने ज्यांना अधिकार सोपविलेले असतील अशा बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या दोन अधिका-यांनी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४६०म ची सुधारणा.

७. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४६०म मधील, पोट-कलम (१) मध्ये,—

(१) "पन्नास हजार रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी "तीन लाख रुपयांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, तीन लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या कोणत्याही संविदेच्या निविदेची सूचना, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.".

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४६०क्यू ची सुधारणा.

८. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४६०क्यू मध्ये,—

(१) खंड (अ) मध्ये, "दोन हजार रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी "दहा हजार रुपयांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (ब) मधील परंतुकामध्ये, "पंधरा हजार रुपयाहून" या मजकुराऐवजी "पंचाहत्तर हजार रुपयाहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) खंड (क) मध्ये,—

(एक) "एक लाख रुपयांहून" हा मजकूर ज्या दोन्ही ठिकाणी येईल तेथे "पाच लाख रुपयाहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " कोणत्याही कालावधीसाठी " या मजकुराऐवजी " कोणत्याही सलग कालावधीसाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " दहा हजार रुपयांहून " या मजकुराऐवजी " पन्नास हजार रुपयांहून " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४६०र ची सुधारणा.

९. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४६०र च्या पोट-कलम (२) मधील परंतुकामध्ये, " चारशे रुपयांहून " या मजकुराऐवजी " दहा हजार रुपयांहून " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४६०ट ची सुधारणा.

१०. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४६०ट मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये, " चारशे रुपयांहून " या मजकुराऐवजी " दहा हजार रुपयांहून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " चारशे रुपयांहून " या मजकुराऐवजी " दहा हजार रुपयांहून " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण तीन

### मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याची सुधारणा.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ३१अ ची सुधारणा.

११. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ३१अ च्या पोट-कलम (२) मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :— १९४९ चा मुंबई ५९.

" परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालिका सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशाप्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठ्या अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करून तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी **एक** याप्रमाणे वाटून देण्यात येतील.",

## प्रकरण चार

### नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याची सुधारणा.

१९५० चा मध्य प्रांत व व-हाड २.

सन १९५० चा मध्य प्रांत व व-हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४०अ ची सुधारणा.

**१२.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम ४०अ च्या पोट-कलम (२) मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमत: पालिका सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्‌नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशाप्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठ्या अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करून तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील.".

## प्रकरण पाच

### महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.

१९६५ चा महा. ४०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ६३ ची सुधारणा.

**१३.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ६३ च्या पोट-कलम (२ब) मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमत: परिषद सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्‌नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या परिषद सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशाप्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठ्या अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करून तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.